पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/३८५०४६/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- २९/०९/२०२३

## ☆ वाहतूक नियंत्रण अधिसूचना☆

दिनांक ३०/०९/२०२३ रोजी १५.०० वा. हजरत मोहम्मद पैगंबर जयंती (ईद ए मिलाद) निमित्त जमाते लतीफिया मशिद मिलींदनगर येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथील पीएमपीएल मैदानापर्यंत मुख्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणूकीत पिंपरी पुणे परीसरातील चिखली, नेहरुनगर, वाकड, भोसरी, निगडी, कासारवाडी, काळेवाडी येथून २० मंडळे सहभागी होणार असून ७ ते ८ हजार मुस्लीम बांधव पायी येवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पिंपरी येथे जमणार आहेत. सदर ठिकाणी मिरवणूक संपल्यानंतर पीएमपीएल मैदान येथील सभेच्या ठिकाणी प्रवचन ऐकण्यासाठी मुस्लीम बांधव मोठया प्रमाणात जमा होणार असल्याने मिरवणुक व सभेच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डॉ.शिवाजी पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

## पिंपरी वाहतुक विभाग

| अ.क्र | दिनांक व वेळ | प्रवेश बंदी मार्ग | पर्यायी मार्ग |
|---|---|---|---|
| १ | दि. ३०/०९/२०२३ रोजी १४.०० ते २४.०० | **महावीर चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी** (महाविर चौक चिंचवड कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी कडे सर्व्हिस रोडने येणारी वाहतुकीस प्रवेश बंद) | डी मार्ट इन ग्रेड सेपरेटरमार्गे इच्छितस्थळी जातील |
| २. | | **नाशिक फाटा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी** (नाशिक फाटयाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी कडे सर्व्हिस रोडने येणारी वाहतुक बंद) | डेअरी फार्म ग्रेड सेपरेटर इन व एच.पी.पंप खराळवाडी ग्रेड सेपरेटर इन मार्गे इच्छितस्थळी जातील |
| ३. | | **स्व.इंदिरा गांधी पूल ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी** (स्व.इंदिरा गांधी पूल ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी कडे येणारा वाहतुकीस प्रवेश बंद) | मोरवाडी चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. |
| ४. | | **नेहरुनगर चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी** (नेहरुनगर चौकाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी कडे येणाऱ्या वाहतुकीस प्रवेश बंद) | एच.ए. कॉर्नर बस स्टॉप येथून मासुळकर कॉलनीमार्गे इच्छित स्थळी जातील |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | दि. ३०/०९/२०२३ रोजी १४.०० ते २४.०० | **जयमल्हार खानावळ सम्राट चौक ते मोरवाडी चौक** (जयमल्हार खानावळ सम्राट चौक पासून मोरवाडी चौकाकडे जाणारा मार्ग वाहतुकीस बंद करणे) | सम्राट चौक ते ऑटो क्लस्टर मार्गे मदर टेरेसा ब्रिज, बसवेश्वर चौक मार्गे तसेच जुना मोरवाडी कोर्ट तसेच केएसबी मार्गे इच्छित स्थळी जातील |
| ६. | | **सायन्स पार्क ते मोरवाडी चौक** (सायन्स पार्क कडून मोरवाडी चौकाकडे येणाऱ्या वाहतूकीस प्रवेश बंद) | ऑटो क्लस्टर ते मदर टेरेसा ब्रिज तसेच बसवेश्वर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| ७. | | **क्रोमा शोरुम ते गोकुळ हॉटेल** (क्रोमा शोरुम कडून गोकुळ हॉटेलकडे येणाऱ्य वाहतूकीस प्रवेश बंद) | क्रोमा शोरुम – पिंपरी पुलावरुन भाटनगर मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| ८. | | **पिंपरी चौक ते स्वर्गीय इंदिरा गांधी पुल** (पिंपरी चौकाकडून पुलाकडे जाणारी वाहतुक आवश्यकतेनुसार बंद करणे) | मोरवाडी चौक मार्गे पिंपरी पुलावरुन भाटनगर मार्गे इच्छितस्थळी जातील. |

पिंपरी वाहतूक विभागाचे हद्दीत हजरत मोहंम्मद पैगंबर जयंतीनिमीत्त निघणाऱ्या मिरवणुकांचे अनुषंगाने दिनांक ३०/०९/२०२३ रोजी १४/०० ते ००/०० वा. दरम्यान आवश्यकतेनुसार वरील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक वळविण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

तरी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत वर नमुद केले प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत असुन सदर वाहतूक बदलाची अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे तरी नागरीकांनी दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा

Pawar 29/09

(डॉ.शिवाजी पवार)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **पिंपरी** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner